# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 28.03.2024** **वार: गुरुवार**

---

**<u>शिवजयंती</u>**

छत्रपती शिवाजी महाराज यांची आज तिथीनुसार जयंती आहे. या निमित्त पुणे शहर आणि जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>मार्गदर्शक तत्त्वे</u>**

प्रभागरचने संदर्भात केंद्रानं घेतलेल्या निर्णयाप्रमाणे राज्य शासनानं मार्गदर्शक तत्वं तयार करावीत आणि महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका आणि नगरपालिकांना याबाबत सुचित करावं अशी मागणी पुणे महापालिकेचे माजी नगरसेवक उज्ज्वल केसकर, प्रशांत बधे आणि सुहास कुलकर्णी यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे केली आहे. लोकसभेची निवडणूक संपल्यानंतर महानगरपालिकेची निवडणूक घ्यायची असेल तर आत्तापासून प्रभाग रचना तयार करणं आवश्यक असल्याचं त्यांनी दिलेल्या पत्रात म्हटलं आहे.

**<u>मनपा बदल्या</u>**

राज्य शासनाकडून पुणे महापालिकेतील चार उपायुक्तांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये उपायुक्त चेतना केरुरे, आशा राऊत, संतोष वारुळे आणि प्रसाद काटकर यांचा समावेश आहे. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी आज या चौघांना पुणे महानगरपालिकेतून कार्यमुक्त केलं.

**<u>मतदार जागृती</u>**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड अर्थात पीएमपीएमएलच्या मुख्य कार्यालयात आणि सर्व डेपोमध्ये आज मतदार जनजागृती कार्यक्रमांतर्गत मतदानाची शपथ घेण्यात आली. परिवहन महामंडळाच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयात अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय कोलते, सहव्यवस्थापकीय संचालक नितीन नार्वेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रज्ञा पोतदार-पवार यांच्यासह सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख आणि कर्मचाऱ्यांनी मतदानाचा हक्क बजाविण्याचा निर्धार व्यक्त केला.

**<u>वाहतूक कोंडी</u>**

पुणे शहरातील वाहतूक कोंडी दूर करण्याच्या दृष्टीनं महत्वपूर्ण ठरणाऱ्या वर्तुळाकार मार्ग प्रकल्पातील भूसंपादनाच्या अडचणी त्वरित दूर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिल्या आहेत. त्याचबरोबर भूसंपादनाच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा देखील दिला आहे. राज्य रस्ते विकास महामंडळाकडून या भूसंपादनासाठी 10 हजार 519 कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असताना देखील शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळत नसल्याच्या तक्रारी आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी एका बैठकीत हा इशारा दिला.

**<u>पिंपरी चिंचवड परिवहन</u>**

पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालय, 29, 30 आणि 31 मार्च या सुट्टीच्या दिवशीही सुरू राहणार आहे. 2023-24 या आर्थिक वर्षातील महसूली उद्दीष्ट साध्य करण्यासाठी तसंच मार्चअखेर असल्यामुळे या काळात नवीन वाहनांची मोठ्या प्रमाणात

खरेदी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी नवीन वाहन नोंदणी आणि त्या अनुषंगीक करवसुलीचे कामकाज तसेच इतर परिवहन विषयक कामकाज कार्यालयीन वेळेत सुरु राहणार आहे, असं उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अतुल आदे यांनी कळविले आहे.

**<u>पिंपरी चिंचवड-कर संकलन</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन आणि कर आकारणी विभागाने एक हजार कोटी रुपयांच्या संकलनाचं उद्दिष्ट ठेवलं आहे. उद्यापासून सलग तीन दिवस महापालिकेला सुट्टी असली तरी हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व कर संकलन कार्यालये सकाळी 9 ते रात्री 9 वाजेपर्यंत खुली राहणार आहेत. महापालिकेच्या तिजोरीत आजअखेर 910 कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे.

**<u>शिकारपूर</u>**

ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर ह्यांची पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्यूटर टेकनॉलॉजी अर्थात पीआयसीटी ह्या अग्रगण्य संगणक संस्थेने विद्या परिषदेवर निवड केली आहे. या संस्थेला नुकतीच शैक्षणिक स्वायत्तता मिळाली आहे. डॉ. शिकारपूर गेली चार दशके माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात कार्यरत आहेत.

**<u>रंगभूमीदिन</u>**

जागतिक रंगभूमी दिन काल पुण्यात विविध कार्यक्रमांनी साजरा झाला. नाट्यसंस्कार कला अकादमीने या निमित्तानं नाट्यवाचन, नाट्यछटा आणि नाटिकेचे सादरीकरण केलं.

**<u>कारवाई</u>**

पिंपरी चिंचवड शहरात वाहणाऱ्या मुळा, पवना आणि इंद्रायणी या नद्यांमध्ये राडारोडा टाकणाऱ्या वाहनचालकांवर महापालिकेच्या पर्यावरण विभागाने दंडात्मक कारवाई केली आहे. अशी 9 वाहनं पकडून त्यांच्याकडून सुमारे 1 लाख 15 हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

**<u>हॉकी</u>**

मुलांना खेळाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि हॉकीचा प्रचार, प्रसार व्हावा यासाठी 90 च्या दशकातील ऑलिंपिक सुवर्णपदक विजेते महान डच हॉकीपटू, फ्लोरिस जॅन बोवेलँडर पुण्यात खेळाडूंना प्रशिक्षण देणार आहेत. आज त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. शहरात हॉकीसाठी केवळ दोनच टर्फ मैदानं असून रोटरी क्लबच्या वतीने एक नवीन मैदान तयार करण्यात येणार आहे. 2018मध्ये फ्लोरिस जॅन बोवेलँडर यांनी नाशिकमध्ये विद्यार्थ्यांसाठी हॉकी केंद्र सुरू केलं होतं.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात उन्हाची तीव्रता वाढत असून आज कमाल तापमान 39 अंश तर किमान तापमान 20 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**